ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor:* 6 . 91

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I Special ISSUE - XXXI Year – 7 5 June 2021**

## पर्यावरण आणि मानव विकास

## Environment and Human Development

**Special Issue Editor by**

**Dr. Dharampurikar Bhalchandra Vaijanathrao**

Dept. of Political Science

N. S. B. College, Nanded.

**Editor in Chief : Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded. (MH, India) Email: Shrishprakashan2009@gmil.com

**Director : Mr. Tejas Rampurkar**

(For International contact only +91-8857894082)

**Address for Correspondence :** House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded - 431605 (India -Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com barkar.rajesh@yahoo.com **Mob. No:** +91-9623979067 **Website:** www.wiidrj.com

Coordinator IQAC Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Dist. Parbhani

PRINCIPAL Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Dist.Parbhani

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905


| | | | |
|---|---|---|---|
| 34. | संत साहित्यातील पर्यावरण | डॉ. विठ्ठल केदारी | 183 |
| 35. | संत साहित्यातील पर्यावरण | शारदा किशन धामणगावकर | 187 |
| 36. | पर्यावरणाचा समतोल आणि आदिवासी समुदाय : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. संजय सुरेवाड | 190 |
| 37. | संत वाङ्मयातील कृषिनिष्ठ जाणिवांचा शोध आणि बोध | डॉ. राजीव यशवंते | 194 |
| 38. | आधुनिक शेती व त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम | कविता किसन भोये | 202 |
| 39. | माध्यमे आणि पर्यावरण | प्रा.डॉ. कांचन मुळे | 205 |
| 40. | पर्यावरण आणि राजकारण | प्रा. भोये सुरेश मुरलीधर | 211 |
| 41. | पर्यावरणीय समस्या वास्तव आणि राजकारण | डॉ. मारोती तुकाराम घंटेवाड | 215 |
| 42. | पर्यावरण व आर्थिक विकास | डॉ. महेंद्र पांडुरंग पवार | 220 |
| 43. | पर्यावरण संरक्षण, संवर्धनाबाबत जनजागृतीची आवश्यकता | डॉ. सविता शिवनाथ झुंजारे | 222 |
| 44. | भाषा अध्यापनातून पर्यावरण शिक्षण | प्रा.डॉ.लक्ष्मीविष्णू भंडारे | 226 |
| 45. | लोकसंख्या आणि पर्यावरण | डॉ.अशोक भाऊराव माळशिखरे | 233 |
| 46. | "शाश्वतआर्थिक विकासासाठी पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता" | डॉ. ज्ञानेश्वर नामदेव सोनवणे | 239 |
| 47. | कृषि, शाश्वत विकास आणि पर्यावरण | श्री. राहुल सुखदेव पोखरकर | 247 |
| 48. | मानव विकास निर्देशांकातील आरोग्य संवर्धनासाठी यज्ञातून पर्यावरणाकडे वाटचाल | डॉ. राजेश गं. उंबरकर | 252 |
| 49. | लोकसंख्या आणि पर्यावरण | प्रा. डॉ. लक्ष्मण शिराळे | 263 |
| 50. | जैवविविधतेची संकल्पना आणि महत्त्व | श्री.विनायक दशरथ नाकतोडे | 271 |
| 51. | पर्यावरणवाद आणि आंतरराष्ट्रीय राजकारण | डॉ. किशोर बी. वासनिक | 274 |


Co-ordinator
IQAC
Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

# संत वाङ्मयातील कृषिनिष्ठ जाणिवांचा शोध आणि बोध

**डॉ. राजीव यशवंते**

मराठी विभाग, गुरू बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा (जं), ता. पूर्णा (जं) जि. परभणी - ४३१५११

मानवी जीवन आणि कृषिसंस्कृती यांचे नाते प्राचीन काळापासून पाहायला मिळते. शेती हाच मानवी जीवनाचा आधार राहिला आहे. कृषिसंस्कृतीने मानवाला स्थिर जीवन बहाल केले. शतकानुशतके तो कृषिशी बांधल्या गेला. प्राचीन कालखंडापासूनच त्याचे पडसाद साहित्या उमटताना दिसतात. वेद, उपनिषद या संस्कृत वाङ्यातही अनेक शेतीचे उल्लेख आढळून येतात. पुढे मध्ययुगीन संतवाङ्मयातही मोठ्या प्रमाणात शेतीचे संदर्भ आढळून येतात. सर्वच संत हे ग्रामीण भागात जन्माला आले. त्यांचा ग्रामसंस्कृती आणि कृषिसंस्कृतीशी अतिशय जवळून संबंध आला आहे. मध्ययुगीन संतवाङ्मयात आलेल्या कृषिविषयक संदर्भाचे स्वरूप तपासून पाहण्यासाठी मोठा वाव आहे. येथे संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांच्या अभंरचनेतील कृषिनिष्ठ जाणिवांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

गेली अनेक शतके भक्तगण लाखोंच्या संख्येने पंढरपूर, देह आणि आळंदीला जातात. हे भक्तगण विठ्ठलाचे नामस्मरण आणि ज्ञानोबा-तुकाराम असा जयघोष करताना दिसतात. ओवी, अभंग, भारूडे इत्यादी रचना टाळ-मृदंग-पावलीच्या साथीने म्हटल्या जातात. त्यात बहुेक भक्तगण शेती व्यवसाय किंवा शेतीव्यवसायाशी निगडित असे छोटे-छोटे धंदे करणारे असतात. ग्रामीण भागातील भक्ताी पंढरपूरला जाणारी संख्या जास्त प्रमाणात आढळून येते. या वारीचा मुख्य उद्देश म्हणजे शेती व इतर व्यवसायातून व प्रपंचातून आपले मन तात्पुरते काढून घेऊन ते परमार्थाकडे वळविणे. वारीत चालत असताना भजन-कीर्तनाबरोबरच लौकिम वा आध्यात्मिक गप्पा गोष्टी केल्या जातात; परंतु त्यात संतांनी दिलेल्या शेतीविषयक दृष्टांतांची मात्र चर्चा होताना दिसत नाही. शेतीविषयक बरेचसे विज्ञान संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकारामांच्या रचनेत आढळते याची तितकीशी जाणवी त्यांना नाही असे मनोमन वाटत राहते. प्रवचनकार आपल्या प्रवचनात कीर्तनकार आपल्या कीर्तनातून दृष्टांतदाखल शेती व पर्यावरणाविषयक दृष्टांतांचे विवेचन कमी प्रमाणात करताना दिसतात.

प्राचीन काळी ईश्वर प्राप्तीसाठी ऋषी-मुनी हिमालयात असारा घेत असत. पर्यावरणाच्या सान्निध्यात जाऊन माणसाच्या वस्तीपासून दूर जात असत. आपल्याला ईश्वरप्राप्ती करायची आहे त्यासाठी शांत वातावरणात जाऊन एकांतवास त्यांना जवळचा वाटत असावा. हिमालयातील वातावरणात एकाग्रता बराच काळ टिकून राहण्यास मदत होत असावी. या उलट मात्र महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यासारख्या संतांना ईश्वरप्राप्तीसाठी हिमालयाचा आश्रय घेण्याची आवश्यकता वाटली नाही. पंढरपूर, आळंदी, नेवासे, त्र्यंबकेश्वर, देह इत्यादी मानवी सस्तींच्या ठिकाणी जो निसर्ग आहे तो त्यांच्यासाठी पुरेसा होता. त्यासाठी संत तुकाराम महाराजांना देहू येथील भंडारदऱ्याचा डोंगर पुरेसा होता. ज्ञानेश्वरी या ग्रंथात कृषिविषयक व वनविषयक असंख्यद ृष्टांत आढळतात. ज्ञानेश्वरांकडे वडिलोपार्जित शेती व्यवसाय नसून देखील त्यांनी अनेक कारणांसाठी जो प्रवास केला होता. "त्याकाळी प्रवासाकरिता घोडा व बैलगाडी हीच प्रमुख साधने व ती या भावंडांकडे नसल्यामुळे हा सर्व प्रवास या भावंडांचा पायीच झाला असावा असे वाटते. पायी केलेल्या प्रवासांत वनश्री, निसर्ग, नद्या, डोंगर, शेती, शेतकरी व इतर समाजाशी जवळचा व

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani
Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Estd. 1983

दीर्घकाळ संबंध येतो असे आपल्याला नेहमी प्रत्ययास येते. त्यामुळे ज्ञानेश्वरांना शेतीविषयक दृष्ये पाहता आली व त्यांचे सूक्ष्म अवलोकन करता आले."[१] ज्ञानेश्वरांच्या व तुकारामांच्या रचनेत कृषिविषयक जाणिवा आढळून येण्यास वरील पार्श्वभूमी कारणीभूत असावी. प्रथम ज्ञानेश्वरीतील कृषिविषयक संदर्भाचे स्वरूप लक्षात घेता येईल.

**'ज्ञानेश्वर' या ग्रंथातील कृषिविषयक जाणिवांचा शोध :**

गीतेवरील लोकप्रिय भाष्यग्रंथ म्हणून 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाचा उल्लेख केलया जातो. ज्ञानदेवांनी गीतेतील तत्त्वज्ञ ानाला आपल्या हृदयातील मायेची उब दिली. गीतेतील विचार श्रोत्यांच्या गळी उतरविण्यासाठी ज्ञानदेव अधिक प्रमाणात दृष्टांत देताना दिसतात. त्या दृष्टांतांचे स्वरूप अतिशय व्यापक आहे. एखादे तत्त्व, विचार पटवून देताना ते एक दृष्टांत देऊन थांबत नाहीत तर दृष्टांतांची शृंखलाच त्यांच्या प्रतिभेतून आविष्कृत होते. त्या दृष्टांतामध्ये शेतीविषयक असणारे दृष्टांत मोठ्या प्रमाणात आढळून येतात. त्याचा शोध घेण्यासाठी अजुनही खूप वाव आहे. आपला देश हा कृषिप्रधान देश आहे. बहुसंख्य लोक शेती हाच प्रमुख व्यवसाय करतात. शतीशी निगडित दृष्टांताच्या माध्यमातून ज्ञानदेवांनी अनेक ठिकाणी जीवनविषयक तत्त्वज्ञान पेरण्याचा प्रयत्न केला आहे. शेतीचा उल्लेख करणे हे काही त्यांचे मुख्य प्रयोजन नाही. "ज्ञानेश्वरीमधील मुख्य प्रतिपाद्य विषय, अध्यात्म, परमार्थ हा आहे. उपमा, अलंकार, दृष्टांत स्वरूपात ज्ञानेश्वरांनी शेती हा विषय इतरविषयाबरोबरच आणलेला आहे."[२] कृषी या महत्त्वाच्या घटकांच्या संदर्भात संतांनी केलेले विवेचन पाहणे महत्त्वाचे ठरते.

**परमेश्वरस्वरूपाचे वर्णन करताना बीजाचा दृष्टांत :**

शेती व्यवसायामध्ये बीजाला अतिशय महत्त्व असते. बीजाचे दृष्टांत संतसाहित्यात ठिकठिकाणी आढळतात. ईश्वरस्वरूप वर्णन करताना शेतकऱ्याच्या जीवनाशी निगडित दृष्टांत ज्ञानदेव देताना दिसतात. ईश्वरस्वरूप वर्णनाविषीची जिज्ञासा मनुष्याला पूर्वीपासूनच असल्याचे निदर्शनास येते. ज्ञानेश्वरीच्या सातव्या अध्यायात बीजाचा संदर्भ आढळून येतो.

**"जैसी रसाचीच सुघट। बीजकणिका घनवट।**
**परी तियेस्वत होय काष्ठ। अंकुरद्वारे।।७।१२।५५।।**
**मग तया काष्ठाच्या ठायी। सांग पां बीजपण असे काई।**
**तैसा मी विकारी नाही। जरी विकारला दिसे।।७।९२।।"**

बी - अंकुर - लाकूड या प्रक्रियेत लाकडाच्या ठिकाणी बीजपण असते का सांग बरे? त्याप्रमाणे सात्विकादी सर्व विकार जरी माझ्यापासून उत्पन्न झालेले आहेत. तरी त्यात मी नाही. तसे पाहिले तर कायक्रोस्कोपचा शोध तीनशे वर्षाआतील आहे. बीजाच्या अंतर्गत रचनेविषयीचे ज्ञानदेवांचे भाष्य सातशे वर्षापूर्वीचे आहे. बीज हे सुप्तपणे जीवित आहे. बीजापासून अंकुर-खाड-पाने-फुले-फळे अशी प्रक्रिया दिसते. फळ आणि धान्य सोडून जो भाग शिल्लक राहतो तो मृत असतो. थोडक्यात सुप्त जीवित घन बिजात जीवनरस असतो पण बीजाची प्रक्रिया झाल्यानंतर वाळलेल्या लाकडात सजीवपण नसते असे सूक्ष्म निरीक्षण ज्ञानदेवांनी केलेले आढळते. ईश्वराचे अस्तित्व स्पष्ट करण्यासाठी ज्ञानदेव नैसर्गिक सर्वसामान्यांचा परिचित असा दृष्टांत आढळतात.

**पेरणी विषयक दृष्टांत :**

शेतकरी आणि शेतीच्या संदर्भात पेरणीला अनन्य साधारण महत्त्व आहे. 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात पेरणीचे काही संदर्भ आढळून येतात. शेतजमिनीत बी पेरताना कुठली काळजी घ्यावी म्हणजे चांगली उगवण होऊन पीक उत्पादन वाढेल या विषयी ज्ञानदेव म्हणतात,

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

**नाना कृषिवळु आपुलें। पांघुरली पेरिलें।**

**तैसे झांकी निपजले। दानपुण्य।।१३।७।२०७।।**

शेतकरी ज्याप्रमाणे धान्य पेरल्यावर कुळवाने माती ओढून ते झाकून टाकतो. त्याप्रमाणे केलेले दान व पुण्य तो कोणासही कळू न देता झाकतो. दुसऱ्या एका ठिकाणी वापशाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. चांगल्या उगवणीकरिता मातीच्या ज्या खोलीत बी पेरले आहे त्या खोलीत ओलावा असणे आवश्यक असते. त्याविषयी ज्ञानदेव म्हणतात,

**परी अवधानाचा वाफसा लाधला सोनया ऐसा।**

**म्हणोनि पेरावया धिंवसा श्रीनिवृत्तीशी।।६।४७।४९१।।**

त्यावर सोन्यासारख्या अवधानाचा वाफसा साधल्यामुळे श्रीनिवृत्तीनाथांना ते ज्ञानरूप बीज पेरण्याची उत्कंठा उत्पन्न झाली.

ज्ञानदेवांनी मातीच्या या वाफसा अवस्थेस रास्त वर्णन केले आहे ते किती बहारीचे व अनुभवांचे बोल आहेत, हे हाडाचा शेतकरी असल्याशिवाय कळणार नाही. सोन्यासारखा वाफसा मिळाला म्हणून श्रीनिवृत्तीनाथांना पेरणी करण्याचे ध्यैर्य (धिंवसा) झाले. म्हणज जमिनीच्या वाफसा अवस्थेचे व ते अचूक ओळखण्याचे महत्त्व सातशे वर्षापूर्वीही ज्ञानदेवांना अवगत होते. यावरून कृषितत्त्वज्ञानच ज्ञानदेवांनी मांडले आहे हे लक्षात येते. या अशा कालानुषंगिक नवनव्या दृष्टिकोणातून संत साहित्याकडे पाहण्यासाठी मोठा वाव आहे हे नक्की.

**ओलितातील मूलतत्त्वविषयक संदर्भ :**

बियाणाची चांगली उगवण होण्यासाठी जमिनीत ओल असणे आवश्यक असते. या नैसर्गिक तत्त्वाचा आधार घेत कृष्णार्जुन संवादाचे स्पष्टिकरण एका कृषीओवीत आले आहे.

**जी ज्ञानांचे तयांचे बोल। माजी हृदयभूमिके पडिले सखोल**

**वरि इये कृपेची जाहाली वोल। म्हणोनि संवाद फळेंशी उठ ।।१०।१४।१६४।।**

ऋषींचे शब्द म्हणजे ज्ञानाचे बीज ते माझ्या (अर्जुनाच्या) हृदयरूपी खोल जमिनीत पडले होते; पण त्याला तुमची कृष्णाची कृपारूप ओल मिळाली. त्यामुळे त्यास (कृष्णार्जुन) संवादरूप फळे आली. श्रीकृष्णाच्या कृपारूपाची ओल आणि कृष्णार्जुन फळे ही जी सांगड घातली ती अप्रतिम आहे. म्हणजेच या संवादाला निसर्गतत्त्वाची जोड दिल्याने हा संवाद कधी शिळा होत नाही. शाश्वत तत्त्वाशी ज्ञानदेव त्या अध्यात्म विचाराची सांगड घालतात. ही नाळ जोडण्याची प्रक्रिया जरी जाणिवपूर्वक नसली तरी त्याचा परिणाम मात्र निश्चितपणे होते असे म्हणावे लागेल. जी तत्त्व विचार त्यांना सर्वसामान्यांच्या गळी उतरवायचा आहे. त्याची नाळ ते एखाद्या तत्त्वाशी जोडतात. म्हणून संतसाहित्य शिळे होत नाही असे म्हणावे लागेल.

**माळिये जेउतें नेले :**

अभ्यास करण्याचे जर तुझ्यात सामर्थ्य नसेल तर माझ्या उद्देशाने कर्म करीत जा. माझ्या उद्देशाने कार्म केलीस तरी तुला मोक्षाची प्राप्ती होईल. हा विचार पटवून देताना ज्ञानदेव माळ्याच्या जीवनाशी निगडित दृष्टांत देतात.

**माळिये जेउतें नेले। तेडतें निवांतचि गेलें।**

**तया पाणिया ऐसें केलें। हो आवे गा।।१२।१०।१२०।।**

वरील अवघड तत्त्वज्ञान शेतकऱ्याच्या [illegible] प्रसंगाच्या आधारे ज्ञानदेव पटवून देतात. येथे ईश्वराला माळ्याची [illegible] आहे. माळी पाणी पुढे पुढे जाते. पाण्याची जणू काही माळ्यावर प्रचंड श्रद्धा आहे. म्हणून



Co-ordinator IQAC Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn), Dist. Parbhani - 431511 (M.S.)
PRINCIPAL Shri Guru Buddhiswami Mahavidyalay Purna (Jn) Dist. Parbhani

**नाना कृषिवळु आपुलें। पांघुरली पेरिलें।**

**तैसे झांकी निपजले। दानपुण्य।।१३।७।२०७।।**

शेतकरी ज्याप्रमाणे धान्य पेरल्यावर कुळवाने माती ओढून ते झाकून टाकतो. त्याप्रमाणे केलेले दान व पुण्य तो कोणासही कळू न देता झाकतो. दुसऱ्या एका ठिकाणी वापशाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. चांगल्या उगवणीकरिता मातीच्या ज्या खोलीत बी पेरले आहे त्या खोलीत ओलावा असणे आवश्यक असते. त्याविषयी ज्ञानदेव म्हणतात,

**परी अवधानाचा वाफसा लाधला सोनया ऐसा।**

**म्हणोनि पेरावया धिंवसा श्रीनिवृत्तीशी।।६।४७।४९१।।**

त्यावर सोन्यासारख्या अवधानाचा वाफसा साधल्यामुळे श्रीनिवृत्तीनाथांना ते ज्ञानरूप बीज पेरण्याची उत्कंठा उत्पन्न झाली.

ज्ञानदेवांनी मातीच्या या वाफसा अवस्थेस रास्त वर्णन केले आहे ते किती बहारीचे व अनुभवांचे बोल आहेत, हे हाडाचा शेतकरी असल्याशिवाय कळणार नाही. सोन्यासारखा वाफसा मिळाला म्हणून श्रीनिवृत्तीनाथांना पेरणी करण्याचे ध्यैर्य (धिंवसा) झाले. म्हणज जमिनीच्या वाफसा अवस्थेचे व ते अचूक ओळखण्याचे महत्त्व सातशे वर्षापूर्वीही ज्ञानदेवांना अवगत होते. यावरून कृषितत्त्वज्ञानच ज्ञानदेवांनी मांडले आहे हे लक्षात येते. या अशा कालानुषंगिक नवनव्या दृष्टिकोणातून संत साहित्याकडे पाहण्यासाठी मोठा वाव आहे हे नक्की.

**ओलितातील मूलतत्त्वविषयक संदर्भ :**

बियाणाची चांगली उगवण होण्यासाठी जमिनीत ओल असणे आवश्यक असते. या नैसर्गिक तत्त्वाचा आधार घेत कृष्णार्जुन संवादाचे स्पष्टिकरण एका कृषीओवीत आले आहे.

**जी ज्ञानांचे तयांचे बोल। माजी हृदयभूमिके पडिले सखोल**

**वरि इये कृपेची जाहाली वोल। म्हणोनि संवाद फळेंशी उठ ।।१०।१४।१६४।।**

ऋषींचे शब्द म्हणजे ज्ञानाचे बीज ते माझ्या (अर्जुनाच्या) हृदयरूपी खोल जमिनीत पडले होते; पण त्याला तुमची कृष्णाची कृपारूप ओल मिळाली. त्यामुळे त्यास (कृष्णार्जुन) संवादरूप फळे आली. श्रीकृष्णाच्या कृपारूपाची ओल आणि कृष्णार्जुन फळे ही जी सांगड घातली ती अप्रतिम आहे. म्हणजेच या संवादाला निसर्गतत्त्वाची जोड दिल्याने हा संवाद कधी शिळा होत नाही. शाश्वत तत्त्वाशी ज्ञानदेव त्या अध्यात्म विचाराची सांगड घालतात. ही नाळ जोडण्याची प्रक्रिया जरी जाणिवपूर्वक नसली तरी त्याचा परिणाम मात्र निश्चितपणे होते असे म्हणावे लागेल. जी तत्त्व विचार त्यांना सर्वसामान्यांच्या गळी उतरवायचा आहे. त्याची नाळ ते एखाद्या तत्त्वाशी जोडतात. म्हणून संतसाहित्य शिळे होत नाही असे म्हणावे लागेल.

**माळिये जेउतें नेले :**

अभ्यास करण्याचे जर तुझ्यात सामर्थ्य नसेल तर माझ्या उद्देशाने कर्म करीत जा. माझ्या उद्देशाने कार्म केलीस तरी तुला मोक्षाची प्राप्ती होईल. हा विचार पटवून देताना ज्ञानदेव माळ्याच्या जीवनाशी निगडित दृष्टांत देतात.

**माळिये जेउतें नेले। तेडतें निवांतचि गेलें।**

**तया पाणिया ऐसें केलें। हो आवे गा।।१२।१०।१२०।।**

वरील अवघड तत्त्वज्ञान शेतकऱ्यांच्या जीवनातील प्रसंगाच्या आधारे ज्ञानदेव पटवून देतात. येथे ईश्वराला माळ्याची उपमा दिली आहे. माळी पाणी पुढे पुढे जाते. पाण्याची जणू काही माळ्यावर प्रचंड श्रद्धा आहे म्हणून

Co-ordinator IQAC Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
PRINCIPAL Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Dist. Parbhani

आपली कर्म करताना ईश्वराच्या उद्देशाने केली पाहिजे. "म्हणजे जणू काही ईश्वराला साक्षी ठेवून बिनाहरकत आपण आपली कर्मे केली पाहिजे. शब्द, त्यांचा अर्थ, त्यांची संघटना, त्यांची ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेला एक घरंदाज अभिजात अशी जन्मजात जाण आहे. त्यामुळे त्यांचे दृष्टांत साक्षात प्रतिमा बनतात. ज्ञानेश्वरीचा आकृतिबंध कधीही शिळा होणार नाही याचे हे कारण आहे."[३] ज्ञानदेवांनी बऱ्याच ठिकाणी अशी निसर्गतत्त्वाची सांगड शाश्वत तत्त्वाशी घातल्याने साहजिकच त्याच्या विचाराला चिरकालीत्त्वाची मदत झालेली आढळून येते.

ज्ञानदेवप्रमाणेच संत एकनाथांच्या वाङ्मयात कृषिनिष्ठ जाणिवांचे दर्शन घडते. ज्ञानदेवांच्या काळातील महाराष्ट्राची समृद्ध आणि वैभव एकनाथांच्या काळात लोप पावत चालले होते. दारिद्र्य आणि अज्ञानाने नाथकालीन समाज अक्षरशः होरपळून निघत होता. अशा परिस्थितीत सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्याचे काम एकनाथांनी केलेले दिसते. "या मतभिन्न व वर्णभिन्न परिस्थितीत उच्च धार्मिक जीवनाची मूलभूत तत्त्वे समाजाला समजतील व पचतील अशा सोप्या भाषेत सांगणाऱ्या भक्तिमार्गाचे पुनरुज्जवीन करणे आवश्यक होते आणि ते पुनरुज्जीवन जनार्दन स्वामींच्या आज्ञेमुळे नाथांकडून झाले."[४] नाथांनी विपूल प्रमाणात ग्रंथनिर्मिती केली. त्यांच्या 'एकनाथी भागवत' या ग्रंथातील मोजके काही संदर्भ घेऊन कृषिनिष्ठ जाणिवांचे स्वरूप लक्षात घेण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

**[अ] गुरू माहात्म्य :**

भारतीय संस्कृतीत गुरूला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सदद्यगुरूवाचून ब्रह्मज्ञान केव्हाही होत नाही. गुरूशिवाय सत्य, अहिंसा, शांती, समाधान शक्य नाही. हा पटवून देताना नाथ कृषीशी संबंधीत दृष्टांत देतात.

**वैराग्यरावे शुद्ध केली। पृथ्वी निजवोला ओलली।**
**कठिणत्वेविण मार्दवा आली। नाही अंकुरली बहुबीजे।।९।।**
**अखंड वर्षता जळमेळी। वासनेची ठेपे निराली।**
**सद्भाची ओल जाली। वाफ लागली बोधाची।।१०।।**
**तेथे न पेरतांची जाण। सहज निजबिजे परिपूर्ण।**
**अंकुरली आपणिया आपण। सिद्ध संपूर्ण स्वभावे।।११।।**
**ते परम कृपेचिये पुष्टी। स्वानंदे पिकली समदृष्टी।**
**परमानंदे कोंदली सृष्टी। ऐक्ये सवसाठी जीवशिवा।।१२।।**

- 'एकनाथी भागवत', अ.११ वा ओ.क्र. ९ ते १२

वैराग्याच्या दाबाने शुद्ध केलेली भूमी आपल्या अंगच्या ओलाव्याने आपोआप झिजून तिचा कठीणपणा जाऊन ती मऊ होते; परंतु त्यात बीज रूजवून उगवलेले नसते. त्या भूमिवर जलाचा सतत वर्षाव झाला म्हणजे वासनारूपी मातीची ठेकळे निरून जातात. सद्भावाचा ओलावा लागून त्यातून ज्ञानाची वाफ निघून जाते. तेव्हा मग आत्मबीज न पेरताच त्याला सहज अंकुर फुटतात. शेत स्वभावतःच मोठ्या जोमाने पिकते त्यातील दाणा जन्मतः भरीव असतो. अशा त्या अपार कृपेच्या पोषणाने पिकाला समदृष्टीची कणसे लागतात. सर्व सृष्टी परमानंदाने भरून जाते 'जीव आणि शिव'. यांचे ऐक्य होते.

येथे नाथांनी गुरूमाहात्म्य पटवून देण्यासाठी शेतीशी निगडित संदर्भ दिला आहे. बहुसंख्य असणाऱ्या शेतकऱ्याला त्यांच्या नित्यपरिचयाच्या दृष्टांताच्या आधारे 'जीव आणि शिव' यांचे ऐक्य सोप्या भाषेतून दिले आहे. येथे [illegible] आपल्या पिकासाठी मशागत करतो तसे गुरूच्या मार्गदर्शनाने भक्ताच्या मनोभूमीची [illegible]

Co-ordinator IQAC Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
PRINCIPAL Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Dist.Parbhani

ानाने मशागत केलयाने 'जीव व शिव' यांच्यात ऐक्य निर्माण होते. गुरूच्या कृपेच्या पोषणाने पिकाला समदृष्टींची कणसे लागतात. तशी भरपूर पिकासाठी शेतकऱ्याच्या कृपेची गरज असते. जशी गुरू शिवाय जीवनात समृद्धी नाही तशी शेतकऱ्याशिवाय पिकाला भरभराटी येणार नाही. म्हणजे गुरू - शेतकरी असे नाते दिसते.

**[ब] साधुश्रेष्ठत्त्वाविषयीचे दृष्टांत :**

'एकनाथी भागवत' या ग्रंथातील अकराव्या अध्यायात साधूचे पंचविसावे परबोधकता हे लक्षण सांगताना संत एकनाथ थेट शेतीशी निगडित दृष्टांत देतात -

**"कृषिवल पेरणी करी। भूमिपाडे पिकती घुमरी।**
**अंकुरेना क्षितितळी उखरी। ते बीज निर्धारी अतिशुद्ध।।३२।।**
**भूमीचि सखर निखर। बीज पावन गा साचार।**
**भाविकी उपदेशा विस्तर। विकल्पी नर सुनाट।।३३।।"**

**- 'एकनाथी भागवत', अ. ३३।११।१०३२ ते ३३**

शेतीशी संबंधित महत्त्वाचा घटक म्हणजे जमिनचा पोत. जेथे जमीन सरस निरस असते तेथे बीजाकडे काही दोष नसतो. ते खरोखर उत्तमच असते. त्याप्रमाणे भाविक जन हेच उपदेशाला उत्तम क्षेत्र आहे. विकल्प करणारे निव्वळ माळ जमिनीसारखेच होत.

ज्यांचे मन ज्यात आसक्त असेल त्याचाच त्याला उपदेश करून जो परमार्थ करतो व दुसऱ्याला बोध करण्यास असा समर्थ असतो त्याच्यात ठिकाणी परबोधकता असते हा साधुचा प्रख्यात गुण सांगताना वरील सुंदर दृष्टांत देतात. सरस जमिनीतच अंकुर उगवतो. नीरस जमिनीत अंकुर फुटत नाही. या शेतीच्या मूलभूत गुणधर्माशी नाथ भाविकांच्या मनोभूमीशी सांगड घालतात.

एकूणच एकनाथांच्या वाङ्मयात कृषिनिष्ठ जाणिवांचे दर्शन ठिकठिकाणी घडते. अध्यात्म निरूपण करताना कृषीशी संबंधीत दाखले नाथ देताना दिसतात. यापुढे संत तुकारामांच्या अभंगरचनेतील कृषिनिष्ठ जाणिवांचा शोध घ्यायचा आहे.

संत तुकारामांच्या अभंगरचनेतही ओघाने अनेक विषय येत जातात. कालानुषंगाने कृषिनिष्ठ जाणिवांचा शोध घ्यायचा प्रयत्न केला तर अनेक संदर्भ आढळून येतात.

**शेतीचा प्रत्यक्ष अनुभव असणारे कवी संत तुकाराम :**

संत तुकारामांच्या अभंगरचनेत आपण कुणबी असल्याचा उल्लेख आढळतो. तुकाराम महाराज म्हणतात, "बरा देवा कुणबी केलो। नाही तरी दंभेचि असतो मेलो।।" किंवा "तुका कुणबियाचा नेणे शास्त्रमत। एक पंढरीनाथ विसंबेना।।" यासारख्या वचनातून आपण स्वतः शेतकरी असल्याचा उल्लेख केला आहे. इतर संतांच्या तुलनेत संत तुकारामांच्या रचनेत कृषिशी निगडित अस्सल अनुभव आढळून येतात. कृषिविषयक संदर्भाच्या माध्यमातून सबंध एक व्यापक जीवनपट तुकाराम साकार करत जातात. खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवनानुभूती हीच त्यांच्या कवितेची मूळ प्रेरणा आहे. असे असले तरी मुख्य प्रयोजन अध्यात्म निरूपण आणि धर्मजागृतीतून जनजागृती हेच असल्याचे आढळून येते.

तुकारामांचया घरी पारंपरिक शेती हा व्यवसाय केला जात होता. विठ्ठलावर अगाढ श्रद्धा आणि शेतीवर प्रचंड निष्ठा त्यातून त्यांच्या जगण्याला वेगळी दिशा मिळाली. "तुकारामांच्या वंशपरंपरागत मालकीची पंधरा एकर बागायती जमीन नदीकाठी होती. तो जातीने कुणबी असून त्यांचे वाण्याचे दुकानही गावात होते. त्याशिवाय थोडाफार



Coordinator IQAC Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
PRINCIPAL Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Dist. Parbhani

सावकारीचा धंदाही तो तरूणपणी करीत असे. त्याच्या शेतात घराण्याच्या मालकीचे जुने विठ्ठलाचे देऊळ होते. अशा रीतीने लहानपणापासून तुकाराम हा जोडला गेला होता."[५] तुकारामांच्या रचनेत विठ्ठलभक्ती अध्यात्माबरोबरच कृषीशी निगडित असंख्य संदर्भ त्यामुळेच आढळून येत असावेत.

तुकारामांच्या कृषिविषयक अनुभूतीचे स्वरूप अतिशय वास्तवदर्शी असल्याचे निदर्शनास येते. तुकारामासारखे प्रतिभासंपन्न, सर्जनशील कवी मध्ययुगात शेतकरी कुटुंबात जन्माला आले हे भाग्यच म्हणावे लागेल. "तुकारामांनी मात्र कृषी जीवनविषयक अनुभवाच्या ना-ना कळा कवितेत मांडल्या. शेतकरी जीवनाचे विविधांगी दर्शन त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. शेती संस्कृतीच्या अस्सल जीवनानुभवाचा गाभाच तुकारामांच्या कवितेत चैतन्याने विलसत राहिल्याचे प्रकर्षाने जाणवते."[६] शेतीविषयक तत्त्वज्ञान तुकारामाच्या रचनेत आढळून येते. सर्वसामान्य असणाऱ्या शेतकरी वर्गास आजही कुसूमाग्रज आणि करंदीकर या कवींच्या कवितेपेक्षा ज्ञानोबा-तुकाराम या कवींच्या कविता अधिक परिचित आहे. तुकाराम आपलेसे वाटण्यास त्यांची जीवनविषयक अनुभूती कारणीभूत ठरते. कृषिविषयक संदर्भाच्या बाबतीत तुकोबांच्या रचनेतून तत्त्वज्ञान व उपदेशाचे मोठ्या प्रमाणात दर्शन घडते. त्यांनी दिलेले शेतीविषयक त्यांच्या उपदेशात व्यवस्थितपणे बसतात. कृषिविषयक संदर्भ हे त्यांच्या आवडीचे आणि तितक्याच हक्काचे क्षेत्र वाटत राहिले आहे.

शेती म्हटलं की कष्ट आलेच, कष्टाशिवाय शेतातील पिकाची अपेक्षा करणाऱ्या शेतकऱ्याला मूर्ख म्हटले आहे. संसारातील क्षुद्र कारणांकरिता भक्तांनी देहत्याग करू नये, तर भावीकाळातील हरिप्राप्ती करण्याकरिता देहाचे रक्षण करावे हा आध्यात्मिक विचार पटवून देण्यासाठी खालील संदर्भ दिला आहे -

**बीजापोटी पाहे फळ। विध न करितां सकळ।।१।।**
**तया मुर्ख म्हणावे वेडे। कैसे तुटेल सांकडे।।२।।**
**दावितिया वाट। वेडी धरुं पाहे चाट।।३।।**
**पुढिल्या उपाया। तुका म्हणे राखा काय।।४।।**

**- 'तुकाराम गाथा', अ.क्र.७७६, पृ.क्र. १९३**

नांगरणे, बी पेरणी या क्षुद्र कारणांकरिता देहत्याग न करता देहाचे रक्षण करणे नंतरच हरिप्राप्ती. थोडक्यात योग्य क्रमाने, योग्य दिशेने श्रम, कष्ट केल्यानेच पिकाची प्राप्ती होते. तसे देहात्याग योग्य मार्गाने केल्यास हरिप्राप्ती होते. असा दृष्टांत दिला आहे. पुढे एका ठिकाणी प्रयत्नवादाशी संबंधित दृष्टांत येतो.

योग्य प्रयत्नावाचून कोणतेही फळ मिळत नाही. मध्ययुगात या कालखंडात अंधश्रद्धा, कर्मकांड वाढले होते. तत्कालीन समाज क्रियाशून्य बनला होता. लोकं आळशी बनले होते. मध्ययुगात हा विचार त्या काळाच्या अनुषंगाने खूप प्रगतशील वाटतो. तुकारामांचे वेगळेपण की त्यांनी प्रयत्न, श्रम, कष्ट हाच त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव राहिला आहे. हा विचार खालील दृष्टांताच्या आधारे पटवून दिला आहे.

**बीज पेरी शेती। मग गाडेवरी वाहती।।१।।**
**वाया गेले असे दिसे। लाभ त्यांचे अंगी वसे।।२।।**
**पाल्यांचे जतन। तरि प्रत्यक्ष येती कणा।।३।।**
**तुका म्हणे आळा। उदक देता लाभे फळा।।४।।**

**- 'तुकाराम गाथा', अ.क्र. २०१२, पृ. ५०३**

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani-431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

बी पेरले जाते. ते वाया गेले असे वाटते. अंकुर-पाला-रक्षण-कणीस म्हणजे असे टप्प्याटप्प्याने कष्ट, प्रयत्न केल्याने लाभ होतो शेवटी पीक येते. प्रयत्नवादाला शेतकऱ्याचा जीवनक्रम ते जोडतात हे विशेष. योग्य वेळी योग्य धारणाने योग्य प्रयत्न केल्याशिवाय लाभ होत नाही. असे तुकारामांचे चिंतन आढळते.

**जो परमार्थ अनुभवाच्या कसाला उतरतो तो खरा :**

जो परमार्थ अनुभवाच्या कसाला उतरतो तोच खरा असतो. हा आध्यात्मिक उपदेश कृषिशी निगडित दृष्टांत देऊन तुकाराम पटवून देतात -

**खोल ओली पडे ते पीक उत्तम। उथळा श्रम वाया जाय।।१।।**
**लटिक्याचें आम्ही नव्हो सांटेकरी। भीतें घाली भरी पदरीचे।।२।।**
**कोणा इहलोकी पाहिजे पसारा। दंभ पोट भरायचे चाडें।।३।।**
**तुका म्हणें कसी आगी जें उत्तरे। तेंचि येथे सरे जातिशुद्ध।।४।।**

**- 'तुकाराम गाथा', अ.क्र. २६४२, पृ.क्र. १०२**

बी खोल ओलीत पडल्यानेच उत्तम पीक येते. या उलट उथळपणाने पेरणी केलयास केलेले श्रम वाया जातात. तुकारामांच्या विचारात अतिशय स्पष्टता दिसते. एखाद्या विचाराच्या मुळाशी त्यांची ठाम भूमिका कशी दिसते ते वरील दृष्टांतावरून लक्षात येते. परमार्थरूपी मालाचा सौदा करणारे आम्ही अविचारी नाही असे ते ठणकावून सांगतात. आम्ही पोटार्थासाठी परमार्थ करणारे दांभिक नाही. या विचारावरून त्यांची परमेश्वरावरील निष्ठा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रामाणिकपणा याचे दर्शन घडते. या दोन्ही गोष्टींचे सहज आकलन होण्यासाठी त्यांनी दिलेला कृषिनिष्ठ जाणिवांचा संदर्भ खूप उपयुक्त ठरतो. पेरणतील उथळपणा आणि परमार्थतील उथळपणा दोन्ही काही कामाचे नसतात. हे त्यांना पटवून द्यायचे आहे.

शेतीशी संबंधित परिचयाच्या दृष्टांताच्या आधारे अवघड तत्त्वज्ञान पटवून द्यायचा प्रयत्न केला आहे

**चित्त शुद्ध :**

परमार्थासाठी चित्त शुद्ध असावे लागते. चित्त शुद्ध ठेवण्यासाठी खूप काळजी घेतली पाहिजे. हे सर्वसामान्यांना पटवून देण्यासाठी तुकाराम खालील दृष्टांत देतात -

**डोळयामध्ये जैसे कणू। अणु तेंहि न समाये।।१।।**
**तैसे शुद्ध करा हित। नका चित्त बाटवूं।।२।।**
**आपुल्याचा कळवळ। आणिका बाळावरिन ये।।३।।**
**तुका म्हणे बीज मुड। जैशा चाडा पिकाच्या।।४।।**

**- 'तुकाराम गाथा', अ.क्र. २१९६, पृ.क्र. ५४६**

शेतकऱ्यांच्या जीवनात शेती व्यवसायाच्या संदर्भात बियाणाला अतिशय महत्त्व आहे. शेतकरी पुढच्या वर्षासाठी बियाणे अतिशय सुरक्षित ठेवत असतो. बियाणाची शेतकरी खूप काळजी घेत असतो. त्यात त्याचे हित दडलेले असते. ही बियाणाची काळजी घेणे शेतकऱ्याला चांगले माहिती असल्याने शेतीशी निगडित दृष्टांत तुकाराम देतात. परमार्थ करण्यासाठी चित्तही तितकच शुद्ध असावे लागते. चित्ताला थोडासादेखील विटाळ होऊ देता कामा नये. हे वरील दृष्टांत देऊन पटवून अतिशय सोप्या पद्धतीने पटवून दिले आहे.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

मध्ययुगामध्ये सर्वसामान्य जनतेच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले होते. जसे ईश्वराचे स्वरूप कसे आहे? श्वराला प्राप्त करण्याचे मार्ग कोणते? ईश्वरप्राप्तीचा सोपा आणि श्रेष्ठ मार्ग कोणता? या आणि अशा अनेक प्रश्नांची त्तरं तुकारामांच्या अभंगरचनेत आढळून येतात. त्यातील वरील कृषीशी संबंधित दृष्टांत महत्त्वाचा ठरतो.

तुकारामांनी सिद्धांत आणि दृष्टांताची अतिशय सुंदर सांगड घातली आहे. त्यांनी दिलेला दृष्टांत त्या तत्त्वाशी पदेशाशी इतका चपखल बसतो की त्यांची कविता नित्यनूतन वाटायला लागते. थोडक्यात तुकारामांची कृषिनिष्ठा ठ्ठलनिष्ठेतून साकार झाली आहे. निसर्गातील नैसर्गिक गुणधर्म आणि कृषीसंदर्भ प्रमाणा माणून तुकाराम ामान्याबरोबरच वैश्विक पातळीवरही सर्वांनाच आपलेसे वाटतात.

एकूणच संत साहित्यात दृष्टांताकडून सिद्धांताकडे या दृष्टिकोणातून संशोधन करण्यास बराच वाव आहे असे ्णता येईल. संत साहित्यात आलेलया बहुसंख्य संदर्भाचे सूक्ष्म निरीक्षण करून एका नव्या दृष्टीने संतसाहित्याकडे हण्यास मोठी संधी आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**दर्भग्रंथ :**

१. काळभोर पु. नां. 'ज्ञानेश्वरीतील कृषिदर्शन', कृषिविज्ञान प्रकाशन पुणे, पृ. क्र. २३
२. तत्रैव, पृ. क्र. २८
३. कुळकर्णी मधु, 'ललित साहित्यातील आकृतिबंधाची जडणघडण', सारस्वत प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली, पृ.क्र. १०३
४. नसिराबादकर ल. रा., 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती सातवी, पृ.क्र. १००
५. नेमाडे भालचंद्र, 'तुकाराम गाथा काही निवडक अभंग', साकेत प्रकाशन, पृ.क्र. ७
६. पाटील तानाजी, 'समाजजीवनातील तुकाराम', पद्मगंधा प्रकाशन, पृ.क्र. १३९

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Estd. 1963

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani